RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ




बुधवार, ०९ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : १०४ | दैनिक | किंमत : ₹५/-
Wednesday, 09 April 2025 | Year : 5 | Issue : 104 | Daily | Rate: Rs. 5/-

## काँग्रेसने कंबर कसली, भाजपाचे टेन्शन वाढणार?



**गांधीनगर :** गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 99 जागा जिंकून पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर महाराष्ट्र, हरियाणा, तेलंगणा व दिल्ली विधानसभा निवडणुकीत पक्षाला एकापाठोपाठ एक पराभवाचे धक्के बसले. या धक्क्यांमधून सावरत काँग्रेस पुन्हा एकदा नव्या जोमाने कामाला लागली आहे. या वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यासाठी पक्षाचे नेते आतापासूनच कामाला लागले आहेत. त्याशिवाय गुजरातमधील गमावलेली सत्ता काबीज करण्यासाठी काँग्रेसन खास रणनीती आखली आहे. आज व उद्या म्हणजेच 8 व 9 एप्रिलला गुजरातमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन होत आहे. तब्बल 64 वर्षांनी हे अधिवेशन होत असल्याने त्याला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. भाजपाकडून सरदार वल्लभाई पटेल यांच्या राजकीय वारशावर दावा केला जातो. मात्र, महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांनीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली होती, असे लोकांना पटवून सांगण्याचा काँग्रेसकडून प्रयत्न होताना दिसून येत आहे. विशेष बाब म्हणजे चार महिन्यांपूर्वी काँग्रेसने महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या 100 व्या वर्धापन दिनानिमित्त बेळगाव येथे पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक आयोजित केली होती. ही बैठकही काँग्रेसच्या दीर्घ इतिहासातील महत्त्वाचे टप्पे आणि स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या प्रमुख भूमिकेची आठवण करून देण्यासाठी होती, असे राजकीय विश्लेषक सांगतात.

गुजरात हे राज्य प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा बालेकिल्ला आहे. तीन दशकांपासून भाजपानं राज्यात एकहाती सत्ता स्थापन केली आहे. अशा परिस्थितीत गुजरात काबीज करणे काँग्रेससाठी सोपे असणार नाही. त्यासाठी पक्षाला प्रचंड मेहनत घ्यावी लागणार आहे. केंद्र सरकारला कोंडीत पकडण्यासाठी काँग्रेसने वेगवेगळ्या रणनीती आखाव्यात, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी राज्यातील आपले दौरे वाढवावेत, असा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा सूर आहे.

### 2027 मध्ये भाजपाचा पराभव करू

2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दोन वेळा गुजरातचा दौरा केला आहे. आता काँग्रेसच्या अधिवेशनासाठी ते पुन्हा एकदा गुजरातमध्ये मुक्काम ठोकणार आहे. आम्ही तुम्हाला (भाजपा) अयोध्येत हरवले आहे आणि 2027 मध्ये तुमचा गुजरातमध्येही पराभव करू, असे राहुल गांधी काही दिवसांपूर्वी आपल्या संसदेतील भाषणात म्हणाले होते. काँग्रेसच्या या अधिवेशनाच्या स्वागत समितीच्या अध्यक्षपदी शक्तिसिंह गोहिल यांची निवड करण्यात आली आहे; तर अमित चावडा यांच्याकडे संयोजकपद देण्यात आले आहे. शक्तिसिंह गोहिल हे सध्या गुजरात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत.

### गुजरातमध्ये तीन दशकांपासून भाजपाची सत्ता

तीन दशकांपासून काँग्रेसला गुजरातमध्ये विजय मिळवता आलेला नाही. पक्षाने अनेक प्रयत्न करूनही त्यांना राज्यात भाजपाचा पराभव करता आलेला नाही. असे असूनही काँग्रेसने आतापासूनच मिशन 2027 अंतर्गत गुजरात काबीज करण्याची तयारी सुरू केली आहे. तब्बल सहा दशकांनंतर गुजरातमध्ये काँग्रेसने दोन दिवसीय अधिवेशन ठेवले आहे. यापूर्वी 1961 मध्ये भावनगर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले होते. दरम्यान, काँग्रेसच्या दोनदिवसीय अधिवेशनात पक्षाचे नेते राज्यातील राजकीय परिस्थितीवर चर्चा करतील. तसेच सलग दोन विधानसभा निवडणुकांमध्ये राज्यात पक्षाला आलेले दारूण अपयश आणि लोकसभा निवडणुकीत बसलेला फटका यावरही विचारमंथन करणार आहेत.

### सरदार पटेलांच्या स्मारकामधून काँग्रेसचे मोदींना आव्हान



**गांधीनगर :** काँग्रेसमधील संघाचे छुप्या पाठिराख्यांना पक्षातून काढून टाकण्याची आक्रमक भूमिका घेतल्यानंतर पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी अहमदाबादमधील सरदार पटेल यांच्या राष्ट्रीय स्मारकातून पंतप्रधान नरेंद्र मोदींना आव्हान दिले आहे. मोदींची सत्ता असलेल्या गुजरातमध्ये काँग्रेसने सरदार पटेलांच्या स्मारकांमध्ये काँग्रेसचा जथ्था जमा झालेला आहे. याच सरदार पटेल स्मारकातून काँग्रेसला नवी दिशा देण्याचा प्रयत्न होत आहे. हे अधिवेशन म्हणजे काँग्रेससाठी मोठे वळण असेल असा दावा कर्नाटकचे उपमुख्यमंत्री **डी. के. शिवकुमार** यांनी पत्रकारांना सांगितले. सरदार पटेल हे काँग्रेसचे दिग्गज नेता होते पण, काँग्रेसने त्यांच्यावर अन्याय केला असे सांगत भाजपने पटेल आमचेच असे म्हणायला सुरुवात केली. पण, या अधिवेशनातून सरदार पटेलांना पुन्हा काँग्रेसमध्ये आणले जात आहे. सरदार पटेल स्मारकाच्या बाहेर लावलेल्या मोठ्या पालकांमध्ये ठळकपणे सरदार पटेल पाहायला मिळतात. इथे अन्य दिग्गज काँग्रेस नेत्यांनी छायाचित्रे नाहीत फक्त सरदार पटेलच दिसतील!

## भरधाव कारने अनेकांना चिरडले; 3 जणांचा मृत्यू, 6 जण गंभीर जखमी




**जयपूर :** देशभरात दररोज वेगवेगळ्या अपघाताच्या घटना घडत असल्याचे पाहायला मिळत आहे. आता राजस्थानच्या जयपूरमध्येही 'हिट ॲण्ड रन'चा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. एका भरधाव वेगाने येणाऱ्या एसयूव्हीने अनेक पादचाऱ्यांना चिरडल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये 3 जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. सोमवारी रात्री उशिरा जयपूरच्या एमआय रोड ते नाहरगड रोडवर एका कार चालकाने तब्बल डझनभर वाहनांना धडक दिली. तसेच अनेक पादचाऱ्यांना देखील चिरडले. यात 3 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच 6 जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

## तर बिहारमध्ये भाजपाचा एकही आमदार निवडून येणार नाही : प्रशांत किशोर



**पाटणा :** बिहारमध्ये यावर्षीच्या अखेरीस विधानसभा निवडणूक होणार आहे, त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष आतापासून तयारीला लागले आहेत. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पार्टीनेही बिहारची निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. 'आमचा पक्ष या निवडणुकीच्या निकालावर मोठा प्रभाव टाकणार', असा दावा त्यांनी केला आहे. इतकेच नाही तर नितीश कुमार हे पुन्हा मुख्यमंत्री होऊ शकणार नाहीत, असे भाकीतही त्यांनी केलं आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशांत किशोर यांनी मुलाखतीत दिली. या मुलाखतीत त्यांनी राज्याचे राजकारण आणि विविध सामाजिक प्रश्नांवर सडेतोड उत्तरे दिली.

## अशोक आणि मरियम ढवळे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्युरोमधील नवीन सदस्य



**तमिळनाडू :** तमिळनाडूच्या मदुराई येथे रविवारी झालेल्या 24 व्या राष्ट्रीय अधिवेशनात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोमध्ये अशोक ढवळे आणि मरियम ढवळे या जोडप्याची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी मरियम यांच्या पॉलिटब्यूरोमध्ये झालेल्या निवडीमुळे पक्षात काही बदल घडतील का, असे विचारले असता त्यांनी म्हटले, 'एक महिला नेता म्हणून मी व माझ्यासारखे इतर लोक पक्षात आणि त्यांच्या उपक्रमांमध्ये स्त्री-पुरुष असा दृष्टिकोन खूप प्रकर्षाने पाहतात.' मरियम यांचे पती व पॉलिटब्यूरो सदस्य अशोक ढवळे यांनी सांगितले, 'मरियम या देशातील स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या पहिल्या महिला राज्य सरचिटणीस होत्या.' ढवळे हे सीपीआय (एम)च्या नवनिर्वाचित पॉलिटब्यूरोमधील जोडपे आहे. त्यांनी त्यांच्या वैवाहिक आयुष्यात, तसेच पक्षासाठी कायम एकत्रितपणे काम केले आहे. तीन वर्षांपूर्वी 75 वर्षांच्या वयोमर्यादेमुळे पक्षाचे आणखी एक जोडपे आणि दीर्घकाळ कार्यरत असलेले नेते प्रकाश व वृंदा करात यांनी राजीनामे दिले. त्यांना आता पॉलिटब्यूरोमध्ये स्थान मिळाले आहे. दरम्यान, करात जोडपे केंद्रीय समितीचे विशेष निमंत्रित सदस्य म्हणून पक्षाशी जोडलेले राहणार आहेत. पॉलिटब्यूरोमध्ये प्रत्येक जण हा स्वतःचा असतो, असेही या जोडप्याने सांगितले. 'मला खात्री आहे की, आमच्यात समन्वय आहे आणि आमचे विचार स्वतंत्र आहेत. त्यात भौतिक फरक नसेल', असे अशोक यांनी म्हटले. 'पदवी शिक्षण घेत असताना दोघांनीही स्वतंत्रपणे मोर्चे काढले, तसेच ते कॉम्रेड म्हणून पॉलिटब्यूरोचा भागही होते. एखाद्याच्या आवडी समजून घेणारा जोडीदार असणं खरोखर महत्त्वाचे आहे. असे बरेच प्रसंग आलेत, जेव्हा मी बराच काळ प्रवास करीत असते आणि त्यानंतर अशोक मोठ्या प्रवासाला जातात. पण, घरी साधी खिचडी करायची असेल तरी ती निःसंकोचपणे आम्ही दोघेही बनवतो', असे मरियम यांनी सांगितले. आयुष्याचा जोडीदार निवडताना कायम सुसंगता पाहावी, असा सल्लाही त्यांनी यावेळी इतर महिलांना दिला.

## प्राध्यापिकेच्या ऐवजी शिपाई तपासत होता उत्तर पत्रिका



**भोपाल :** मध्य प्रदेशमधील एका महाविद्यालयातील शिपाई विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका तपासत असल्याचा व्हिडीओ जानेवारी महिन्यात व्हायरल झाला होता. त्यानंतर आता विद्यापीठाने मोठी कारवाई केली आहे. ज्या प्राध्यापिकेने शिपायाला पैसे देऊन उत्तर पत्रिका तपासून घेतल्या होत्या, त्या प्राध्यापिकेला आता बडतर्फ करण्यात आले आहे. प्रकृती बरी नसल्यामुळे शिपायाला उत्तर पत्रिका तपासण्याचे काम दिले होते, असा खुलासा सदर प्राध्यापिकेने केला आहे. जानेवारी 2025 मध्ये एक शिपाई विद्यार्थ्यांचे पेपर तपासत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. पन्नालाल पथारिया नामक शिपाई मध्य प्रदेशच्या पिपारिया शहरात असलेल्या शहीद भगत सिंग सरकारी पदव्यूत्तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पेपर तपासत होता. प्राध्यापक खुशबू पगारे यांच्याकडून हे काम मिळाले असल्याचे शिपायाने सांगितले. सदर व्हिडीओ समोर आल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी स्थानिक आमदार ठाकूर दास नागवंशी यांच्या सहकार्याने तक्रार दाखल केली. मात्र उच्च शिक्षण विभागाने सुरूवातीला याची दखल घेतली नाही. सोशल मीडियावरील व्हिडीओमुळे अनेक लोक टीका करू लागल्यानंतर उच्च शिक्षण विभागाने चौकशीसाठी समिती स्थापन केली.

## 12 राज्यात 'हायटेक फ्रॉड' प्रकरणी पोलिसांची कारवाई




**लखनऊ :** उत्तर प्रदेश पोलिसांनी बदायूं आणि अमरोहा येथील हायटेक आधार कार्ड फ्रॉडचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात 12 राज्यांतील 1500 हून अधिक आधार कार्ड्सच्या बायोमेट्रिक डेटाशी छेडछाड झाल्याची माहिती समोर आली आहे. संभलचे पोलीस अधीक्षक कृष्ण कुमार बिश्नोई आणि उपअधीक्षक अनुकृती शर्मा यांच्या पथकाने या प्रकरणात एकूण चार जणांना अटक केली आहे. आधार कार्डाशी संबंधित डेटा फ्रॉड करणारी ही गँग आहे. त्यांनी 200 ते 300 जणांसह फ्रॉडचे जाळे उभे केले आहे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, पंजाब, दिल्ली यांसह 12 राज्यांमध्ये हे नेटवर्क पसरले आहे. आत्तापर्यंत या गँगने 1500 आधार कार्डातील डेटाशी छेडछाड केली आहे. त्यांना लिंक असलेले मोबाइल क्रमांक बदलले आहेत. एवढंच नाही तर या आधारे या गँगने खोटी जन्म प्रमाणपत्रे आणि रेशन कार्डही तयार केली आहेत.

## विधिमंडळात सर्वाधिक प्रश्न भ्रष्टाचार, गैरव्यवहारांवर



**मुंबई :** नुकत्याच संपलेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये 288 विधानसभा आमदारांकडून 6937 तारांकीत प्रश्न सादर करण्यात आले होते. त्यामधून 491 प्रश्न स्वीकृत झाले. सर्वपक्षीय आमदारांच्या या तारांकित प्रश्नांमध्ये शासकीय योजनेतील गैरव्यवहार संदर्भात सर्वाधिक प्रश्न आहेत. शासकीय येजनेतील गैरव्यवहारासंदर्भातील आमदारांच्या या प्रश्नांनी राज्य प्रशासनात असलेला भ्रष्टाचार चव्हाट्यावर आला आहे. दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक प्रश्न हे शासकीय रुग्णालयातील दुरवस्था तसेच औषधांचा तुटवडा यासंदर्भातले आहेत. रस्ते, रोहयो, आवास योजना आणि शासकीय इमारतींच्या निकृष्ट कामासंदर्भातही आमदारांनी मोठ्या संख्येने प्रश्न सादर केलेले आहेत. त्याचबरोबर आमश्रमशाळा आणि मध्यान्ह भोजन आहारमधून विद्यार्थ्यांना झालेल्या विषबाधेसंदर्भात मोठ्या संख्येने प्रश्न या अधिवेशनामध्ये दिसले. आश्चर्य म्हणजे या अधिवेशनात परळीच्या औष्णीक विद्युत केंद्रातील राखेसंदर्भात पहिल्यांदा अनेक प्रश्न आले आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे भास्कर जाधव, सुनिल प्रभू ( प्रत्येकी 22 प्रश्न), काँग्रेसचे विजय वडेट्टीवार (16 प्रश्न), राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) रोहीत पवार, (14 प्रश्न) या विरोधी बाकावरच्या महाविकास आघाडीच्या आमदारांचे सर्वाधिक प्रश्न स्वीकृत झालेले आहेत. भाजपचे सुरेश धस (20 प्रश्न), राष्ट्रवादी काँग्रेसचे काशिनाथ दाते (13 प्रश्न), शिवसेनेचे मंगेश कुडाळकर (7 प्रश्न) या सत्ताधारी बाकावरील महायुतीच्या आमदारांनी प्रश्न सादर करण्यात आघाडी घेतली आहे. छोट्या पक्षांमध्ये समाजवादीचे रईस शेख यांचे सर्वाधिक (9 प्रश्न) तारांकीत प्रश्न लागले आहेत. विधानसभेत 21 महिला आमदार आहेत. महिला आमदारांचे 267 प्रश्न स्वीकृत झाले असून यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुलभा खोडके यांचे सर्वाधिक (5 प्रश्न) प्रश्न आहेत. बहुतांश आमदारांचे प्रश्न त्यांच्या मतदारसंघातील समस्यांसंदर्भात आहेत. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) रोहित पवार याला अपवाद ठरले आहेत. परभणीतील दलित अत्याचार, बोगस बियाणे, महापालिकेची थकबाकी, शेतकरी कर्जमाफी, प्रलंबित प्राध्यापक भरती, एसटी बँक गैरव्यवहार, लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी, गुंतवणुकदारांची फसवणूक असे राज्यव्यापी प्रश्न पवार यांचे आहेत. तारांकीत प्रश्न 30 दिवस अगोदर पाठवले जातात. समान विषयावर आलेले प्रश्न संयुक्त (क्लब) होतात. ज्या प्रश्नाचा क्रमांक लहान असतो, त्याला प्राधान्य मिळते. म्हणजेच ज्यांनी लवकर प्रश्न सादर केला, त्यांचे प्रश्नाला पहिले नाव येते. प्रश्नांची दर आठवड्याला संगणकीय सोडत निघते. स्वीकृत न झालेले प्रश्न अतारांकीत होतात आणि त्यावरची उत्तरे संबंधितांना पाठवली जातात. 'लवकर, वेगळा आणि ठरवून दिलेल्या पद्धतीत प्रश्न सादर केल्यास तो स्वीकृत होण्याची शक्यता अधिक असते', असे तारांकीत प्रश्नांचे व्यवस्थापन करणाऱ्या विधिमंडळातील 'ब' कक्षाकडून सांगण्यात आले.









“ आदर दिला तरच आपली मूल्ये आणि संस्कार टिकून राहतात. ”



# प्रज्ञावंत आंबेडकरी योद्धा - बॅरिस्टर खोब्रागडे

*आधुनिक भारताच्या नवनिर्माणाचे युगप्रवर्तक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हयात करून समृद्धि, सुसंस्कृत आणि सुवर्णमयी भारताच्या निर्मितीचे दिव्य भव्य असे स्वप्न प्रत्यक्षात केले. या स्वाक्षातूनच यांच्या राजकीय, संस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक तत्वज्ञानाची तसेच महासंग्रामची मुहूर्तमेढ रोवली गेली. भगवान बुद्ध, सम्राट अशोक यांच्या ऐतिहासिक कर्तव्यानंतर भारतमातेच्या कुशीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा सुपूत्र निर्माण होऊन एक नव्या सर्जनशील, स्वातंत्र, समता, बंधुत्व आणि करुणा यांना युगप्रवर्तक मूल्यांची पाठ पखरणसाठी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या पुत्रप्रवर्तक प्रेरणेने संस्कारीत झालेले एक समृद्ध व्यक्तिमत्व म्हणून बरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचा उल्लेख केला जातो.*

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचा जीवनपट हा एका सुसंस्कृत, पारंगत प्रज्ञ व्यक्तिमत्वाचा संघर्षनामा आहे. त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचे आकलन झाले म्हणजे या सत्याची प्रचिती येते. साक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्वात त्यांनी संघर्षशील संवेदन जाणिवांचे संस्कार रुजविले होते. कारण राजाभाऊंनी आपले जीवनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आगीला महासंग्रामाला समर्पित केले होते. तारण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या राजाभाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याकडून जी दीक्षा घेतली होती ती केवळ राजकीय उत्तरदायित्वाची नव्हती तर तिचे परिमाण हे अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी होते. म्हणूनच राजकीय कर्तृत्वाबरोबरच जीवनाच्या विविध बाबींमध्येही राजाभाऊंनी आपला विशिष्ट असा ठसा उमटविला होता. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे आणि त्यांचे समकालीन जे डॉ. आंबेडकरी नेते आपआपल्या परीने सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित होते हे खरे; प्रत्येकाची एक विशिष्ट लकब होती आणि यामुळे स्वतंत्र असा पाठिराखा अनुयायी वर्ग होता. परंतु हे उच्चविद्याविभूषित नेते हे ही संकुचित जाणीवेने संस्कारीत महत्वाकांक्षी ठरल्याने नंतर डॉ. आंबेडकरी समग्र गतीला छेद देणारे ग्रहण लागलेले दिसते. राजाभाऊ खोब्रागडे यांची अव्यभिचारी निष्ठ डॉ. आंबेडकर निष्ठा म्हणूनच लक्षणीय ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समवेत साठच्या नेतृत्वात कार्य कामाची बॅरिस्टर राजाभाई खोब्रागडेंना जी संधी मिळाली त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व संस्कारीत आणि प्रभावीत होत गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भंडारा लोकसभेच्या पोट निवडणूकीसाठी उभे असतांना प्रथमतः डॉ. बाबासाहेबांच्या समवेत जेव्हा पाहिले तेव्हापासूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे आकर्षण निर्माण झाले. त्यानंतर त्यांच्या अनेक प्रसंग आणि घटना यामध्ये प्रत्यक्षात सहभागी होता आले. त्यांचा व्यापक जनसंपर्क, सहकारी यांच्याप्रती त्यांच्या असलेले कणन आणि गद्दष्ट गाठण्यासाठी यांच्या ठायी असलेली मानसिक, वैचारिक एकाग्रता आणि धैर्य हे यांचे माझ्यासारख्या विद्यार्थी-युवकासाठी मार्गदर्शक, प्रेरक अंतर्मुख करणारे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या समग्र महासंग्रामाचे नेतृत्व राजाभाऊंनी सर्वशक्तिनिशी सांभाळले. त्याचाच एक भाग म्हणून त्यावेळी महाराष्ट्रभर धर्मांतर समारंभ सोहळ्याच्या कार्यक्रमांची जमू स्पर्धाच सुरु झालेली दिसते. आमच्या वरठी (भंडारा रोड) येथे आम्ही आयोजित केलेल्याच्या धर्मांतराच्या कार्यक्रमाला राजाभाऊ मुख्य अतिथी होते आणि यांच्याच हस्ते धर्मांतर कार्यक्रम संपन्न झालेला होता. त्याहीप्रसंगी त्यांच्या अध्ययनशील धम्म जाणीवांचा प्रत्यय आलेल होता. माझ्या जीवनात राजाभाऊंचा अनेकदा सहवास लाभला आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू प्रत्यक्षात अनुभवता आले. रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन असो वा डॉ. आंबेडकर अध्ययन मंडळ असो. माझ्या डॉ. आंबेडकर तत्वज्ञानः प्रचिती आणि आविष्कार' या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याला ते मुख्य अतिथी होते त्यानंतर बऱ्याच साहित्य संमेलनात ते स्वतः उपस्थित राहिले त्यामुळे त्यांच्या अंतःस्थ जाणीवांचे विलोभनीय दर्शन घडते. आजचे आमचे राजकीय नेते सुध्दा अनेक सोहळे पार पाडताना दिसतात, परंतु त्यामधील त्यांचे स्वार्थी पणा लपून राहात नाही.


ताराचन्द्र खांडेकर
मो.9421806186

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे व्यक्तिमत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्राप्त झालेल्या संस्कारातून घडले होते. हे पूर्वी म्हटलेच आहे. त्यामुळे त्याचे प्रत्यंतर राजाभाऊंच्या अनेक भाषणातून येते. राजाभाऊंची संसदेमधील भाषणे असोत की सार्वजनिक कार्यक्रम मधील भाषणे असोत त्यामधून आढळणारा समग्र डॉ. आंबेडकर विचार हा विचारोत्तेजक राहिला आहे. राज्यसभेतील त्यांची विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण भाषणे यांच्या तकनिष्ठ, बुद्धी-प्रामाण्यवादी, आधुनिक विज्ञाननिष्ठ आणि विरोधकांच्या टीकेचा समाचार घेताना अध्ययन-शीलतेचा परिपाक आहे.


बहुजन सौरभ

अभ्यास केला तर त्यांना साहसाचे आकलन होईल. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि मुंबईपासून कठकच्या पर्यंत सर्व राज्यात रिपब्लिकन पक्षाचा निळा ध्वज आणि हत्ती हे निवडणूक चिन्ह स्वाभिमानाने तळपत होते, काही राज्यामधील संयुक्त आघाडयामध्ये रिपब्लिकन पक्षाचे आमदार मंत्रीपदावर आरूढ झालेले होते हा इतिहास बहुजन समाज पक्षाच्या लोकांनी लक्षात घेतला तर त्यांची आत्मप्रौढी किती एकलाडू आहे हे स्पष्ट होईल. हे सगळे बॅरि. खोब्रागडे यांच्या संघटन चातुर्य आणि व्यापक दृष्टीकोण त्याप्रमाणेच सर्वजातीधर्माच्या कार्यकर्तृवांचा त्यांनी संपादन केलेला विश्वास याचे फलित होते. बामसेफ आणि ब.स.पा. याचे कांशिराम आणि त्यांचे अन्य सहकारी यांनी त्यांच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये बॅरि. खोब्रागडे यांच्या नेतृत्वाचा उपयोग करून घेतला हा इतिहासही त्यांनी विसरता कामा नये?

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचा राजकीय जीवनपट अनेक पदरी आहे. प्रतीक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या नेतृत्वगुणविर आणि बुद्धीचातुर्यावर भर देऊन त्यांची नियुक्ति करून सुध्दा बॅरि. खोब्रागडे यांचा अहम् सामुहिक नेतृत्वाच्या आड आला नाही. स्वतः प्रेसिडियमचे अध्यक्ष असूनही एन. शिवराज यांच्या निर्वाणानंतर त्यांनी दादासाहेब गायकवाड यांना अध्यक्षपद बहाल करून ते सरचिटणीस राहिले. रिपब्लिकन पक्षाच्या उत्कर्षाचा तो काळ होता. स्वतः राजाभाऊ एन. शिवराज, बी. सी. कांबळे, दत्ता कट्टी, दादासाहेब गायकवाड, हरिहरराव सोनुळे ही खासदार मंडळी आपल्या भाषणावर संसदेमध्ये आपला प्रभाव गाजवत अनेक प्रश्नांना वाचा फोडत होते. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे राज्यसभेत बोलायला उभे राहिले की सर्वच राजकीय पक्षाचे खासदार राजाभाऊंचे भाषण गांभिर्याने ऐकत असत. भारताच्या परराष्ट्रीय धरणापासून तर द्वितीय पध्दती, सांसदीय लोकशाही, अंदाजपत्रक (बजेट), भारताची एकता - अखंडता, भाषावार प्रांतरचना, अँडव्होकेट्स बिस, द्रविडरिस्थान, स्वातंत्र विदर्भ आदि विविध समस्यांबद्दल आपले विचार व्यक्त करीत असत. त्यांची ही भाषणे आंबेडकर तत्त्वप्रणीनुसार करण्यात आलेले कनिष्ठ, भातसंगत आणि कल्याणकारी असे विश्लेषण आहे. केवळ भावनिक प्रश्नावर. सिद्ध केंद्रित न करता एकूणच भारतीय विचार त्यामधून विचार प्रसूत झालेला आढळतो. आज गेली 25 - 30 वर्षे जे कोणी दलित आणि बहुजन समाजाचे खासदार म्हणून सुख भोगू लागले तो ही या नेतृत्वाने चरित्रहनन करू लागला. डॉ. आंबेडकरी समाजातील हा मुक कर्ता अभी बुद्धीजीवी वर्गाचे तत्कालिन लोक विद्रोहाची भाषा म्हणून हितांनी गौरविले रिपब्लिकन पक्षाच्या प्रभावाला नष्ट करायाचे कार्य केले. आज या बुध्दीजीनी वर्गाचे स्वरूप पाहिले की त्यांच्या या रिपब्लिकन द्रोही मनोभूमिकेची कीव येते. आपली बुद्धिमत्ता शाबूत ठेवून या मुक वर्गाने तसेच या पांढरपेशा बुध्दीजीवींनी आपला सवतासुमा वेगळा निर्माण केला असता नसता तर डॉ. आंबेडकरी समाज आज भारतावरील राजकारणात राजकीय प्रभाव भक्कमपणे पाडू शकता असता!

या पार्श्वभूमीवर बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे कार्य प्रेरणादायी आहे. रिपब्लिकन पक्षाचे अनेक अ.भा. नेते पक्ष सोडून अन्य राजकीय पक्षात गेले आणि आंबेडकरी राजकीय शक्तीला विश्वासघात केला तरी राजाभाऊंनी रिपब्लिकन पक्षाला कोणाचा वेठबिगार होऊ दिले नाही. प्रासंगिक राजकीय तडजोड आणि लाचारी यामधील फरक ज्यांना कळत नाही त्यांना बॅ. खोब्रागडे यांच्या नेतृत्वाचे सम्यक आकलन होऊ शकत नाही. त्यांनी त्याही परिस्थितीत पांढरपेशा बुध्दीजीनी नोकरदार वर्गाच्या आरक्षणाचे प्रश्न मार्गी लावले. त्यांनी त्यासाठी अखिल भारतीय आरक्षणवादी शिखर परिषद घेऊन आरक्षणाच्या संबंधी विविध बाबीवर चर्चा करून श्वेतपत्रिका तयार करून तिचा पाठपुरावा केला. दलित पँथर्सचे जे नेते रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाचे चरित्रहनन करीत होते त्यानाही गोंजारून त्यांच्या आक्षेपांची शहानिशा लगवा याचा त्यांनी केस, दोलित पँथर्सचे जे नेते आज रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून एकाधिकारशाही गाजवत आहेत त्याना आपल्या तत्कालिन रिपब्लिकन द्रोहाचा पश्चाताप झाला पाहिजे.

डॉ. आंबेडकरी सम्यक भ्रांतीचे पारिक म्हणून डॉ. आंबेडकरी समाजातील बुद्वीवादी वर्ग महत्वाची भूमिका बजावू शकतो अशी बरि. राजाभाऊंची धारणा होती. त्यामुळे या बुध्दीवादी विचारवंत, लेखक, कवी, साहित्यक यांच्याशी प्रत्यक्ष व्यक्तिशः संबंध प्रस्थापित करून त्यांच्याशी संवाद सहित राहिले हे राजाभाऊंचे वैशिष्ट होते. त्यामुळे कोणत्याही मानापमानाची पर्वा न करता अनेक साहित्य संमेलन आणि अन्य वैचारिक कार्यकमानाने अगत्याने उपस्थित रहात. स्वतः संवेदनशील जाणिवांच्या स्पंदनांनी ओतप्रोत भरलेला राजाभाऊ खोब्रागडे यांचा पिंडच कवीमनाचा होता. मॉरिस कॉलेजच्या भावविश्वाने त्यांचे मन आणि बुध्दी पुलकित झालेले होते. शैक्षणिक संस्थांमधून अशा लेखक-विचारवंतांची समृध्द पिढी निर्माण व्हावी आणि त्या पिढीने आपले सामाजिक उत्तरदायित्व प्रामाणिकपणे स्वीकारावे यासाठी ते झटत असत. त्यांनी सुरु केलेल्या रिपब्लिकन टाईम्स आणि प्रजासत्ताक आदि नियतकालिकामधून अनेक लेखक-विचारवंत लेखन करीत असत आणि राजाभाऊ त्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहात. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे म्हणजे डॉ. आंबेडकरी सम्यक भांतीचा एकमत सेनानायक म्हणून समर्थपणे कार्यरत होते. त्यांनी स्वाभिमाना गहाण ठेवून कोणत्याही तडजोडी स्वीकारल्या नाहीत. किंबहुना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सम्यक क्रांतीला अविरोध निर्माण करणाऱ्या हिताउंचा कोणताही मुलाहिजा न ठेवता ते तुटून पडत. त्यासाठी त्यांना कोणाच्याही राग बोलाची पर्वा राहात नसे! असा हा हक्काच्या मनाचा, कर्तव्य कठोर धैर्यवान आणि प्रज्ञावंत मित्र, सखा आणि मार्गदर्शक डॉ. आंबेडकरी महासंग्रामाचा योद्धा म्हणजे बॅरि. राजाभाऊ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन!! ■■

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे समर्पित पुढारी

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे परदेशातून उच्च शिक्षण घेऊन भारतात आले होते. डॉ. बाबासाहेब यांच्या आदेशानुसार आंबेडकरी चळवळीत कार्य करू लागले. शेड्युल कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष दशरथ लक्ष्मण पाटील हे होते. पक्षांचे काम उत्तम सुरू होते. 1949 ला शेड्युल कास्ट फेडरेशन मधून ग.म. ठवरे यांना पक्षातून काढले होते. त्यांचा परिणाम पक्षावर होणार होता.

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सच्चे अनुयायी दानशूर देवाजी भिवाजी खोब्रागडे यांनी आंबेडकरी चळवळ कशी मजबूत होईल यासाठी अथक परिश्रम घेतले. देवाजी बापू खोब्रागडे यांचा मोठा मुलगा भाऊराव म्हणजे राजाभाऊ खोब्रागडे होय. राजाभाऊ नावाने ते प्रसिद्ध झाले.*

1953 ला हरिदास आवळे बाबू हे वऱ्हाड प्रांताचे महासचिव होते. त्यांनी वाय. एम. सी. सभागृह नागपूर येथे सभा बोलाविली. सभेच्या शेवटी प्रस्ताव मांडला की दशरथ पाटील यांनी पक्षांसाठी झिज सहन केली. पक्ष वाढविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्याबद्दल पक्ष कृतज्ञ राहील परंतु ते आता म्हातारे झाले असून पक्षाला नवीन रक्ताची गरज आहे. म्हणून बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे हे परप्रदेशातून उच्च शिक्षण घेऊन परत मायदेशी आले आहेत. म्हणून मी प्रस्ताव मांडतो की शेड्युल कास्ट फेडरेशन वऱ्हाड प्रांताचे अध्यक्ष म्हणून नाव सुचवितो सभागृहाने हा ठराव पास करावा अशी विनंती करतो. सभागृहाने एका मताने ठराव पास केला. जेव्हा पक्षाध्यक्षाच्या खुर्चीवर बसण्याचा प्रसंग आला. तेव्हा दशरथ पाटील यांनी मुद्दा उपस्थित केला की अध्यक्षांची जागा खालीच नाहीतर अध्यक्ष कसे निवडता. परंतु सभागृहाने ठराव पास केल्यामुळे समता सैनिक दलाच्या मदतीने बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना अध्यक्ष पदावर विराजमान केले.

1955 ला पान राजभोज यांनी पक्ष सोडून काँग्रेस पक्षाच्या सोबत गेले त्याची सचिव पदाची जागा खाली होती. अखिल भारतीय शेड्युल कास्ट फेडरेशनच्या सचिव पदी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांची बाबासाहेब आंबेडकरांनी निवड केली.

14 ऑक्टोबर 1956 ला नागपूर येथे बुद्ध धम्माचा स्विकार केला गेला त्यासाठी खोब्रागडे साहेबांनी परिश्रम घेतले.16/10/1956 (16 ऑक्टोबर 1956) ला चंद्रपूर येथे धर्मांतराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.


बहुजन सौरभ

6/12/1956 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर 30/31 डिसेंबर 1956 व 1 जानेवारी 1957 ला अहमदनगर येथे शेड्युल कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीची सभा बोलाविली. पहिल्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करून सभा संपली.

दुसऱ्या दिवसी सभा सुरू झाली व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तोडीचा नेता नसल्यामुळे पक्ष अध्यक्षीय मंडळामार्फत चालेल असे ठरले. अध्यक्षीय मंडळाचे अध्यक्ष पदावर बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांची एकमताने निवड झाली. सचिव निवडण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यात आला. त्यांनी अॅड. हरिदास आवळे बाबू यांना सचिव निवडले. 1957 च्या निवडणूक संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर युती करून निवडणूक लढल्या खासदार व आमदार निवडले गेले.


विनायकराव जामगडे
मो.9372456389

3/10/1957 ला पवित्र दीक्षाभूमीवर शेड्युल कास्ट फेडरेशनचे अधिवेशन बोलाविण्यात आले व त्यांत रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. 1964 मध्ये रिपब्लिकन पक्षाने भूमीहीनाचा सत्याग्रह देशात झाला. सत्याग्रहींना ठेवण्यास जेल अपूरे पडू लागले. शाळेत सरकारी निवासस्थानी सत्याग्रहींना ठेवण्यात आले. 1967 ला उत्तरप्रदेश, पंजाब व बिहार मध्ये पक्षाला यश मिळाले. तीनही राज्यात रिपब्लिकन पक्ष सरकारमध्ये सामील झाले. मंत्री झाले.

1967-68 च्या दरम्यान रिपब्लिकन पक्षाची कार्यकारिणीची सभा झाली दादासाहेब गायकवाड यांनी काँग्रेस पक्षाच्या सोबत युती करण्याचा प्रस्ताव पारित केला.

युतीच्या संबंधी मतभेद झाल्यामुळे 1970 ला बॅरिस्टर खोब्रागडे यांना सरचिटणिस पदावरून काढण्यात आले. 1970 मध्ये कर्मवीर हरिदास आवळे बाबू यांना सोबत घेऊन रिपब्लिकन पक्ष सुरू केला. त्यांनी काँग्रेस पक्षा सोबत सहकार्य केले नाही. विरोधी पक्ष म्हणून आपली प्रतिमा निर्माण केली. काँग्रेस पक्षांनी त्यांनां राष्ट्रपती पदाची आफर दिली परंतु त्यांनी नाकारली. ते विरोधी नेते म्हणून कार्य करू लागले. 1982 ला पांढुर्णा मध्यप्रदेश येथे पक्षाचे भव्य अधिवेशन झाले. रिपब्लिकन पक्षाची ऐकता करण्याचे आवाहन केले. माझे उर्वरित आयुष्य रिपब्लिकन पक्ष एक करण्यासाठी खर्ची घालेल असे बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी सांगितले होते. ■■

# बॅरि. खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली डेमोक्रॅटिक ट्रेड युनियन


बहुजन सौरभ

ज्यांनी सघन कुटुंबात जन्म घेऊनही लहानपणापासूनच समाजसेवेच्या क्षेत्रात उडी घेतली. बॅरिस्टर झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विनंतीवरून ते समाजकार्यात उतरले आणि शेवटपर्यंत समाजसेवा करत राहिले.

**ज्यांच्या खांद्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मिशनची पायाभरणी मोठ्या आत्मविश्वासाने दिली आणि ज्यांनी आयुष्यभर मिशनसाठी स्वतःला झोकून दिले. त्या आंबेडकरवादी, दलितांचे नेते, कामगारांचे हितचिंतक आणि खासदार आदरणीय बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे पहिले व्यक्ती होते.**

**खंदे नेतृत्व :** या देशात समता, न्याय आणि बंधुत्वाचे राज्य प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने राजकीय सत्ता हाती घेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या अनुसूचित जाती महासंघाचे ते सरचिटणीस होते आणि नंतर ते रिपब्लिकन पक्षाच्या प्रेसीडियमचे अध्यक्ष होते. रिपब्लिकन पक्षात दोन गट निर्माण झाल्यानंतर ते शेवटपर्यंत एकाच गटाचे (खोरिपा) अध्यक्ष राहिले. पक्षाच्या फुटीमुळे त्यांना खूप दुःख झाले होते, तरीही ते पक्षाचे नेतृत्व करतांना कधीही डगमगले नाही, वैयक्तिक फायद्यासाठी त्यांनी तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्याचा परिणाम असा झाला की त्यांनी त्वरीत संपूर्ण समाजाचा विश्वास संपादन केला आणि सर्वजण त्यांच्या सोबत आलीत.

**आंदोलनकारी नेता :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात जी काही चळवळ सुरू केली. राजाभाऊ खोब्रागडे नेहमीच त्यांच्यासोबत राहिले. 1965 मध्ये भूमिहीनांना जमीन देण्यासाठी देशव्यापी आंदोलन सुरू केले गेले, ज्यामुळे सत्तेत असलेल्यांमध्ये घबराट निर्माण झाली. ते यशस्वी करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या चळवळीने जनमानसावर अमिट छाप सोडली. या नंतरही त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या तत्वधानात अनेक आंदोलनांमध्ये भाग घेतला. मंडल आयोग लागू करण्यासाठी त्यांनी सर्वप्रथम चळवळ सुरू केली आणि दलितही त्यांच्यासोबत असल्याची ग्वाही त्यांनीच बहुजनांना दिली.


प्रभाकर सोमकुवर
मो.9595255952

**कामगारांचे हितचिंतक :** बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे कामगारांचे खरे हितचिंतक मानले जात होते. काही वर्षांपूर्वी त्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली 'डिमोक्रॅटिक इंडियन ट्रेड युनियन' कामगारांच्या हक्कांबाबत त्यांना किती आस्था होती हे दर्शविते. डेमोक्रॅटिक इंडियन ट्रेड युनियनच्या कामगारांना संबोधित करतांना ते म्हणाले होते की, त्यांनी असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न करावा. त्यांचा विडी कामगारांवर विशेष विश्वास होता.

**लोकशाही के पुरस्कर्ता :** माननीय बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. ते म्हणाले की, लोकशाहीतच अत्याचारित दलित, आदिवासी आदी उपेक्षितांना त्यांच्या प्रगतीची संधी मिळू शकते. नोटबंदीला विरोध करून त्यांनी लोकशाही प्रती आपली कट्टर निष्ठा दाखवून दिली. लोकशाही यशस्वी होण्यासाठी प्रबळ विरोधी पक्ष असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विरोधकांना एका झेंड्याखाली आणण्याचे त्यांचे जोरदार प्रयत्न सुरूच होते. ते विरोधकांच्या ऐक्याचे शिल्पकार मानले जात होते.

**सच्चा देशभक्त :** दलितांवर होत असलेल्या अगणित अत्याचारांना कंटाळून काही लोकांनी दलितस्थानाची मागणी सुरू केली. पण बॅरि. साहेबांनी त्याला कडाडून विरोध केला. हा देश आमचा असून आम्ही येथील मूळ रहिवासी आहोत, असे ते म्हणाले. येथे दलित, शोषित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे दलिस्थानाची मागणी रास्त नाही. या देशात राहून आपण आपली मागणी पूर्ण करू शकतो. अशा प्रकारे ते भारताच्या अखंडतेच्या बाजूने राहिले आणि यावरून त्यांची खरी देशभक्त म्हणून ओळख दिसून येते. आजपासुन त्यांची जन्मशताब्दी वर्ष सुरु होत आहे. त्यानिमीत्त त्यांच्या पावन स्मृतीस मानाचा मुजरा ! ■■

# डॉ. बाबासाहेबांची उज्ज्वल झुंजारवृत्ती आम्हात कायम आहे

*‘बाबासाहेब केवळ युगपुरुषच नव्हे तर युगप्रवर्तकही होते. कित्येक युगानंतर येणारी ही महान विभूती आज आपणात नाही हे मान्य आणि म्हणून समाजाच्या प्रगतीचा गाडा धैर्याने, हिंमतीने पुढे नेण्याच्या आम्ही संकल्प केला आहे.’ ‘स्वावलंबी व्हा’ हा बाबासाहेबांचा संदेश आम्ही डोळ्यासमोर ठेवला आहे. आपल्या भाषणातून ओजस्वी संदेश देणारे थोर रिपब्लिकन नेते बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचा आज, 9 एप्रिल रोजी स्मृतीदिन त्यानिमित्ताने...*

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि थोर रिपब्लिकन नेते बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचे अतूट ऋणानुबंध राहिले आहे. अगदी तरुणपणात ते डॉ. बाबासाहेबांच्या संपर्कात आले. डॉ. बाबासाहेबांच्या तेजोमय व्यक्तिमत्त्वाचा प्रचंड प्रभाव त्यांच्यावर पडला. कालांतराने राजाभाऊंनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी.ए. आणि लंडनच्या लिकन इनमधून बॅरिस्टरची पदवी संपादन करून स्वतःला डॉ. आंबेडकरी चळवळीला वाहून घेतले ते अगदी शेवटच्या श्वासापर्यंत. त्यांचे खरे नाव ‘भाऊराव’ होते. परंतु कौतुकाने सर्वजण त्यांना ‘राजाभाऊ’ म्हणायचे. पुढे याच नावाने ते नावारूपास आले. वडील देवाजी बापू बल्लारपूरचे पहिले नगराध्यक्ष आणि प्रांतिक कौन्सिलवर स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार होते. तोच वैभवशाली वारसा पुढे राजाभाऊंनी चालविला. राजाभाऊ खोब्रागडे उच्च कोटीचे वक्ते होते. आपल्या विद्वत्ताप्रचूर वाणीने त्यांनी भीमविचारांची आयुष्यभर पेरणी केली. एवढेच नव्हे तर अस्पृश्य, बहुजन वर्गाच्या आर्थिक समस्या, भारतीय संविधानावरही त्यांनी वेळोवेळी उद्बोधक विचार मांडले. अस्पृश्यांची सर्वांगीण उन्नती होईपर्यंत सवलती चालू ठेवणे आवश्यक आहे. देशात लक्षावधी एकर जमीन पडीत आहे ही पडीत जमीन अस्पृश्य आणि बौद्धांना विनामूल्य मिळाली पाहिजे. शेतीला लागणाऱ्या आवश्यक खर्चाकरिता सरकारने आर्थिक मदत दिली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. याच विषयावर त्यांनी 5 नोव्हेंबर 1955 रोजी बाबासाहेबांची ‘जनता’ वृत्तपत्रासाठी खास मुलाखत घेतली होती. नागपूरच्या चिटणीस पार्क मध्ये 8 जानेवारी 1957 रोजी फेडरेशनची भावी भूमिका स्पष्ट करण्यासाठी एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे 80000 जनसमुदायाच्या विराट सभेपुढे मार्गदर्शन करताना राजाभाऊंनी तडफदार भाषण दिले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजासाठी लढणारे खंबीर योद्धे होते. त्यांच्या उज्वल झुंझारवृत्तीमुळेच या समाजाची प्रगती होऊ शकली. त्यांच्यामुळेच या समाजाला मानाचे स्थान प्राप्त होऊ शकले. डॉ. बाबासाहेबांची उज्ज्वल झुंजारवृत्ती आम्हात कायम आहे. आम्ही त्या खंबीर वीराचे वीर पुत्र आहोत. प्राणाची आम्हाला पर्वा नाही. या समाजाच्या उद्धाराकरिता प्रसंगी प्राणाचे बलिदान देण्याचा आम्ही निर्धार केला आहे. प्रगतीच्या पथाकडून आम्हाला परावृत्त करण्याची कोणाचीही छाती नाही. आजपर्यंत आपण ज्याप्रमाणे बाबांच्या नेतृत्वाखाली निकराने लढा दिला. त्याचप्रमाणे पुढेही हा समाज असाच लढा अव्याहत दिल्याखेरीज राहणार नाही हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. डॉ. बाबासाहेबांच्या प्रखर नेतृत्वामुळे हा समाज संघटित झाला आहे आणि आज आमच्यावर कोणीही अत्याचार करेल तर अशा अन्यायाचा प्रतिकार केल्याशिवाय आम्ही राहणार नाही असा आमचा निर्धार आहे.’


मिलिंद मानकर
मो. 8080335096

तसेच बंगलोरच्या नगरभवनात 26 ऑगस्ट 1957 रोजी डॉ. बाबासाहेबांच्या तैलचित्राचे अनावरण डॉ. बाबासाहेबांचे सहकारी हनुमंतप्पा यांची प्रमुख उपस्थितीत राजाभाऊंनी केले. त्यावेळी त्यांनी संपूर्ण सभागृहाला खिळवून ठेवले होते. त्यांचे ते भाषण आजही अखंड स्फूर्तीचा अन् प्रेरणेचा अनमोल नजराणाच आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी म्हैसूर राज्याचे मुख्यप्रधान हनुमंतप्पा होते. त्याचवेळी राजाभाऊंना मानपत्र अर्पण करण्यात आले.


बहुजन सौरभ

मानपत्र स्वीकारल्यानंतर त्यांनी भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र जीवनाचे दिव्यदर्शन आपणास थोड्या वेळात घडविता येणे शक्य नाही. त्यांचे जीवन हा एक विशाल ग्रंथ आहे. विविध क्षेत्रात त्यांनी केलेली भरीव कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. प्रकृतीची तमा न बाळगता केवळ राष्ट्रहित आणि राष्ट्राचे कल्याण डोळ्यासमोर ठेवून स्वतंत्र भारताची घटना बनविली आणि भारतात लोकशाहीचे युग निर्माण केले.’ ते पुढे म्हणाले, ‘डॉ. बाबासाहेब उत्कृष्ट लेखक होते. त्यांनी अनेक विषयावर विचारप्रवर्तक पुस्तके लिहिली. ही पुस्तके त्यांच्या गाढ विद्वत्तेची साक्ष पटवून देतात. लेखनाप्रमाणेच त्यांचा वाचनाचा व्यासंग देखील अपूर्व होता. वेळेचे भान विसरून जाऊन रात्रंदिवस पुस्तक वाचण्यात ते मग्न असत. विविध विषयावरील पुस्तकांचा त्यांनी संग्रह केला होता. त्यांच्या संग्रहासारखा खाजगी संग्रह या भारतात एकाच व्यक्तीजवळ सापडणे दुरापास्त आहे.’

1942 ते 1945 साली ‘शेड्युल्ड कास्टस् स्टुडन्टस् फेडरेशन’चे सेक्रेटरी म्हणून राजाभाऊंनी अतुलनीय कार्य केले, 1950 साली बॅरिस्टरची पदवी ग्रहण करून मायदेशी परल्यानंतर त्यांनी या समाजाची प्रगती होऊ शकली. त्याच्यामुळेच या समाजाला मानाचे स्थान प्राप्त होऊ शकले. डॉ. बाबासाहेबांची उज्ज्वल झुंजारवृत्ती आम्हात कायम आहे. आम्ही त्या खंबीर वीराचे वीर पुत्र आहोत. प्राणाची आम्हाला पर्वा नाही. या समाजाच्या उद्धाराकरिता प्रसंगी प्राणाचे बलिदान देण्याचा आम्ही निर्धार केला आहे. प्रगतीच्या पथाकडून आम्हाला परावृत्त करण्याची कोणाचीही छाती नाही. आजपर्यंत आपण ज्याप्रमाणे बाबांच्या नेतृत्वाखाली निकराने लढा दिला. त्याचप्रमाणे पुढेही हा समाज असाच लढा अव्याहत दिल्याखेरीज राहणार नाही, हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो. डॉ. बाबासाहेबांच्या प्रखर नेतृत्वामुळे हा समाज संघटित झाला आहे आणि आज आमच्यावर कोणीही अत्याचार करेल तर अशा अन्यायाचा प्रतिकार केल्याशिवाय आम्ही राहणार नाही असा आमचा निर्धार आहे.

‘त्यांनी अनेक विषयावर विचारप्रवर्तक पुस्तके लिहिली. ही पुस्तके त्यांच्या गाढ विद्वत्तेची साक्ष पटवून देतात. लेखनाप्रमाणेच त्यांचा वाचनाचा व्यासंग देखील अपूर्व होता. वेळेचे भान विसरून जाऊन रात्रंदिवस पुस्तक वाचण्यात ते मग्न असत. विविध विषयावरील पुस्तकांचा त्यांनी संग्रह केला होता. त्यांच्या संग्रहासारखा खाजगी संग्रह या भारतात एकाच व्यक्तीजवळ सापडणे दुरापास्त आहे.’

1942 ते 1945 साली ‘शेड्युल्ड कास्टस् स्टुडन्टस् फेडरेशन’चे सेक्रेटरी म्हणून राजाभाऊंनी अतुलनीय कार्य केले. 1950 साली बॅरिस्टरची पदवी ग्रहण करून मायदेशी परल्यानंतर त्यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन’च्या चळवळीत प्रत्यक्षरित्या भाग घ्यायला सुरुवात केली. नागपूर प्रदेश शेकाफेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी 1953 ते 55 पर्यंत कार्य केले. ‘शेड्युल्ड कास्ट फेडरेशन’चे संस्थापक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 1956 साली महापरिनिर्वाण झाले. त्यांच्याच अंतिम आदेशानुसार 1957 साली अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. 1959 साली महाराष्ट्रात पडीत जमिनी मिळविण्याच्या उद्देशाने जो सत्याग्रहाचा लढा उभारला त्यावेळी त्यांनी दोन हजार सत्याग्रहींचे नेतृत्व पत्करून सत्याग्रह केला होता. 1964-65 साली रिपब्लिकन पक्षाने आपल्या 10 मागण्यासाठी देशव्यापी लढा उभारला होता त्यावेळीही राजाभाऊंनी लढ्यात सहभागी होऊन देदीप्यमान कामगिरी बजावली होती. त्यावेळी ते राज्यसभेचे सभासद होते.

राजकीय कार्यासोबतच राजाभाऊ खोब्रागडे यांनी धम्मकार्यही तितक्याच नेटाने केले. 1957 साली अमरावतीच्या अचलपूर-रासेगाव गांधी पुलाजवळ राजाभाऊंनी अडीच लाख लोकांना बौद्धधम्माची दीक्षा दिली. त्यामुळे नागपूरची पहिली तर अचलपूरची दुसरी दीक्षाभूमी ठरली आहे. या ऐतिहासिक घटनेचे स्मारक म्हणून भव्य वास्तू येथे उभारण्यात आली आहे. अचलपुरात पार पडलेला दीक्षा समारोह दादासाहेब गवई यांनी आयोजित केला होता. ऐनवेळी राजाभाऊंना आमंत्रित केले गेले आणि हा दीक्षा समारंभ त्यांच्या हस्ते उत्साहाने पार पडला. अशी माहिती वयोवृद्ध कार्यकर्ते रामभाऊ गवई यांनी सांगितली आहे. जानराव थोरात, तुळशीराम वानखेडे हेही त्यावेळी आवर्जून उपस्थित होते. थायलंडची राजधानी बँकाक येथे 1958 साली जागतिक बौद्ध परिषद भरली होती. त्या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभेचे प्रतिनिधी या नात्याने ते उपस्थित होते. याच दरम्यान त्यांनी ब्रह्मदेश आणि थायलंड या बौद्धधर्मीय देशांना भेटी दिल्या. या धम्मप्रवासात त्यांनी बौद्ध स्थळे, बौद्ध धम्मगुरू आणि बौद्ध विचारवंतांशी सुसंवाद साधला होता. राजाभाऊ नेहमी म्हणायचे, ‘डॉ. बाबासाहेब केवळ युगपुरुषच नव्हे तर युगप्रवर्तकही होते. कित्येक युगानंतर येणारी ही महान विभूती आज आपणात नाही हे मान्य आणि म्हणून समाजाच्या प्रगतीचा गाडा धैर्याने, हिंमतीने पुढे नेण्याच्या आम्ही संकल्प केला आहे.’ ‘स्वावलंबी व्हा’ हा डॉ. बाबासाहेबांचा संदेश आम्ही डोळ्यासमोर ठेवला आहे.

जन्मशताब्दीनिमित्त राजाभाऊ खोब्रागडे यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन. ■■

## महत्वाचे

### बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे स्मृति दिनानिमित्ताने विविध कार्यक्रम



**नागपूर :** बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे स्मृतिदिनानिमित्ताने पाणी, अल्पोहर, वितरण, छायाचित्र प्रदर्शन सह विविध कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसपुत्र, रिपब्लिकन पार्टीचे स्मृतीशेष अध्यक्ष आणि राज्यसभेचे माजी उपसभापती बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचा 9 एप्रिलला निर्वाण दिवस असल्यामुळे सकाळी 9 वाजता इंदोरा चौक येथील पुतळ्याला जन्मशताब्दी समारोह समिती तर्फे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. जन्मशताब्दी समिती अध्यक्ष प्रा. अशोक गोडघाटे, ताराचंद खांडेकर, भदंत नागदिपंकर, ई.मो. नारनवरे, तक्षशिला वागधरे, प्रा. गौतमी डोंगरे खोब्रागडे, छाया खोब्रागडे, अर्कि . कल्पना मेश्राम, अशोक कोल्हटकर, सुरेश पाटील, अमृत गजभिये, सिद्धार्थ पाटील, बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये, डॉ. अनमोल टेंभुर्णे, इंजि. राहुल बागडे मिलिंद मेश्राम, हरीश नारनवरे, नरेश वाहने, नरेश महाजन, उमेश बोरकर, आदी मान्यवर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतील, त्याच प्रमाणे, पाणीबाटल, अल्पोहार वितरित करण्यात येणार आहे. विविध, संस्था, संघटना सह बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी समितीचे सदस्य कार्यकर्ते हितचिंतक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

### 'घर घर दैनिक बहुजन सौरभ' अभियान



**नागपूर :** मनीष नगर मध्ये दर गुरुवारी चालू असणाऱ्या धम्म संगोष्टीला जवळपास आठ वर्षे पूर्ण होत आहे. या काळात धम्म संगोष्टीच्या माध्यमातून समाज प्रबोधना व्यतिरिक्त अनेक समाजोपयोगी कार्य सुद्धा केले आहे. दैनिक बहुजन सौरभच्या प्रचार प्रसाराचे अभियान राबवणे हा त्याचाच एक भाग आहे. या अंतर्गत 15 डिसेंबर 2024 पासून दर सोमवारी 'घर घर बहुजन सौरभ अभियान' राबविले जात आहे. सोमवार दिनांक 7 एप्रिल 2025 रोजी विवेकानंद कॉलनीमधील रत्नबोधी विहाराच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन दैनिक बहुजन सौरभचे महत्व समजावून सांगितले. एके काळी धर्मेश प्रसेनजीत रत्न बोधी विहाराचे संस्थापक सचिव होते. त्यांच्या कार्यकुशलतेमुळे या परिसरात जवळपास 60 टक्के कुटुंबियांकडे बहुजन सौरभ असल्याचे आढळून आले. बहुजन सौरभ हे वृत्तपत्र दर्जेदार असून ते प्रत्येक घरात वाचले जावे असा नागरिकांचा उत्फुर्त प्रतिसाद दिसून आला. समाज जागृत करणाऱ्या बहुजन सौरभ या वृत्तपत्राची आणि त्यासाठी राबवले जाणाऱ्या अभियानाची येथील रहिवास्यांनी प्रसंशा केली आणि बहुजन सौरभ परिवारांस मंगल सदिच्छा व्यक्त केल्या. या अभियानाच्या यशस्वितेसाठी धर्मेश प्रसेनजीत, नरेश धोपटे, श्रीराम बनसोड आणि दयानंद कांबळे यांनी सहभाग नोंदवला. या प्रसंगी ॲड. योगेश मंडपे, डॉ. योगिनी राजकुमार मेश्राम, माजी इंजि. शशिकांत गजभिये, प्रशांत वावरे, जनार्दन वंजारी, सुमन गोस्वामी, ईश्वर जंगले, हरिष जाधव, विनय वासनिक, राहुल डोंगरवाल, संगीता बनसोड, चंदू बनसोड, अरविंद फुलमाळी, नितीन बेले, त्रिरत्न वाळके, अधिक्षक दीपक पाटील, अल्का अभय नाईक, धर्मादास आटे, वैभव फुसाटे यांच्या भेटी घेतल्या. उर्वरीत नागरिकांनी त्वरित बहुजन सौरभ सुरू करण्याचे अभिवचन दिले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत उच्चवर्णीयांचा सहभाग होता : अनिल वैद्य

**नाशिक :** युगपुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर विशेषांक.134व्या जयंती निमित्ताने नाशिक येथे प्रकाशित करण्यात आला. प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल वैद्य माजी न्यायाधीश होते, प्रमुख अतिथी जेष्ठ पत्रकार सुरेश निकुंभ, ज्येष्ठ कार्यकर्ते शशीभाई उन्हवने आणि नाशिक शहर पोलिस उपयुक्त किरणकुमार चव्हाण आणि पोलिस उपायुक्त मोनिका राऊत होत्या. कार्यक्रमाचे आयोजन जेष्ठ कार्यकर्ते अविनाश अहेर आणि विशेषांकाचे संपादक सतीश रूपवते यांनी केले.

या प्रसंगी पत्रकारनरेंद्र जोशी आणि इतर उत्कृष्ट कार्य करणाऱ्याचा सत्कार करण्यात आला. तो धागा पकडून अनिल वैद्य यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड प्रकरणाचा संदर्भ दिला. या प्रकरणात उच्चवर्णीय लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरां विरुद्ध खटला दाखल केला होता. मनाई हुकूम मागितला होता. त्यांचे म्हणणे असे होते की अस्पृश्यांनी पाण्याला स्पर्श करू नये असे आमच्या धर्मात आहे म्हणून मनाई हुकूम द्यावा. न्यायालयनेत्यांचे ऐकून मनाई हुकूम दिला होता याला उत्तर देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बाजूने ब्राम्हण पंडित



पालेय शास्त्री, शंकराचार्य कुर्तकोटी, रामभाऊ सावरकर (वि दा सावरकर यांचे भाऊ) यांच्या साक्ष दिल्या त्यांनी सांगितले की, अस्पृश्यांनी सार्वजनिक पाण्याला स्पर्श करू नये असा हिंदू धर्म शास्त्रात उल्लेख नाही. त्यामुळे न्यायालयाने दिलेला मनाई हुकूम रद्द झाला आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर ती केस जिंकले. अनिल वैद्य यांनी दुसरे उदाहरण दिले की, बाळ गंगाधर टिळक यांचा मुलगा श्रीधरपंत टिळक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता संघाचे पुण्याचे उपाध्यक्ष होते. त्यांनी आत्महत्या केली तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी पत्र लिहिले होते व डॉ. बाबासाहेब आंबेडकरां प्रति आदर व्यक्त केला होता. श्रीधरपंत यांच्या मृत्यूचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फार दुःख झाले होते. मनुस्मृती जळणारे सहस्त्रबुद्धे हे ब्राम्हण होते. सीकेपी चित्रे,चिटणीस हे सर्व उच्चवर्णीय लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत होते.

सिद्धार्थ महाविद्यालयात चांगले शिक्षक असावेत असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कटाक्ष असायचा म्हणून ब्राम्हण प्राध्यापक अधिक होते. अलीकडच्या काळात सचिन तेंडुलकर यांचे वडील प्रा. रमेश तेंडुलकर हे मराठीचे प्राध्यापक होते. इत्यादी अनेक इतर समाजाचे लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत होते. कामराण प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अनिल वैद्य म्हणाले अभिव्यक्ती स्वातंर्त्य म्हणजे फक्त भाषण लेखन स्वातंत्र्य नाही तर विडंबन करणे, विनोद, गायन, नृत्य, संगीत वाजविणे हे सुद्धा अभिव्यक्ती स्वातंत्र्य संविधान कलम 19 ने दिलेले आहे.सविधानिक मूल्यांची जोपासना केली पाहिजे. त्या साठीसर्वांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. प्रकाशन समारंभाचा निरोप समारंभ अविनाश अहेर यांनी केला.




रमाईचे स्वप्न - 53

**विश्वशांती बुद्ध विहार जुना सकरदरा.** ह्या विहाराची विशेषता अशी आहे की हे विहार बाबासाहेबांनी दीक्षा देण्या आधीचे म्हणजे 1954 चे विहार आहे. विहारामध्ये नियमित सकाळ संध्याकाळ उपासक-उपासिका बुद्ध वंदना घेतात. विहार कमिटीच्या अध्यक्षा प्रतीक्षा घोडके आता आपल्यात राहिला नाही, परंतु त्यांनी आपल्या कारकीर्दीत विविध वैचारिक आणि बौद्धिक स्तरावर कार्यक्रम घेऊन नवनवीन उपक्रम राबवत होत्या. त्यामध्ये कवी संमेलन प्रबोधनात्मक कार्यक्रम सातत्याने व्हायचे आणि अजूनही होतात. विहारात वाचनालय आहे.

संवाद मित्र - ज्योत्स्ना बनसोड, 918766942982

# आशीर्वाद नगरच्या त्रिसरण बौद्ध विहारात सम्राट अशोक जयंती साजरी

**नागपूर :** आशीर्वाद नगरच्या पंचशील बहुउद्देशीय महिला मंडळ व प्रबुद्ध ज्येष्ठ नागरिक मंडळ यांच्या वतीने त्रिसरण बुद्ध विहारात चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. अजय चिकाटे यांनी सम्राट अशोकाचे व्यक्तित्व व कर्तृत्व याबद्दल सविस्तर माहिती देऊन आपल्या देशाने सम्राट अशोकाचे चक्रवर्ती अशोक चक्र आणि चार सिंह असलेली राजमुद्रा यांचा स्वीकार केला, शिवाय युद्धात विशेष कामगिरी केलेल्यांना अशोकचक्राने सन्मानित केले जाते. सम्राट अशोकाच्या या खुणा भारत सरकारने जपल्या आहेत पण देशपातळीवर सम्राट अशोकाची जयंती पाहिजे तेवढ्या मोठ्या प्रमाणात साजरी केली जात नाही याविषयी खंत व्यक्त करून, शासनाने पुढाकार घेऊन सर्व सार्वजनिक स्थळी सम्राट अशोक यांची जयंती उत्साहाने साजरी करून सम्राट अशोकाला मानवंदना द्यावयास हवी असे डॉ. अजय चिकाटे यांनी याप्रसंगी



आवाहन केले. सम्राट अशोक हे भारतातील एकमेव चक्रवर्ती आणि सम्राट राजा आहेत. त्यांनी विखंडित भारत अखंडित करून भारत देशाच्या सीमांचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला होता. त्यांनी केलेल्या बुद्ध विचारांच्या प्रसारामुळे आज बौद्धधर्म देश- विदेशात पोहोचला व त्यांनी जे शिलालेख, स्तंभलेख व गुहालेख कोरन ठेवले आहेत त्यातून प्राचीन भारताचा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि धार्मिक इतिहास खऱ्या अर्थाने माहीत झालेला आहे. सम्राट अशोकाचे हे कार्य अत्यंत थोर असून सरकारने याची मोठ्या प्रमाणात दखल घेणे अनिवार्य आहे. असेही डॉ. चिकाटे यावेळी म्हणाले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचशील बहुउद्देशीय महिला मंडळाच्या संघमित्रा बोरकर या होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. गौतम तामगाडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना सोनारकर यांनी केले. याच कार्यक्रमात पंचशील बहुउद्देशीय महिला मंडळाच्या विद्यमान अध्यक्ष यशोधरा तामगाडगे यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून त्यांचाही सत्कार करण्यात आला व त्यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी यशोधरा तामगाडगे यांनीही छोटेखानी सत्काराविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचा प्रारंभ बुद्ध वंदनाने झाला व समापन देखील बुद्ध वचनाने झाले.या कार्यक्रमाकरिता दोन्ही मंडळाचे सर्व पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्या डोंगरे, सुरेखा मेश्राम, माया सोनारकर, कल्पना टेणपे, सुनंदा भगत, रामभाऊ टेणपे, कमलाकर डोंगरे आणि इंजिनियर राहुल तामगाडगे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# विदर्भातील नवोदीत गायकांसाठी 'राज ऑडिओ' एक नवा पर्याय : प्रा.डॉ. अनिलकुमार खोब्रागडे

**नागपूर :** ऑडिओ व्हीडिओ रेकॉर्डिंग दिवसेंदिवस महाग होत असल्याने नवोदीत व गावखेडयातील गायक कलावंत सहजासहजी रेकॉर्डिंग करीता तयार होत नाही. त्यामुळे उत्तम आवाज असूनही ते संधीपासून वंचीत राहतात. अश्या वंचीत, उपेक्षित व नवोदीत गायकांसाठी अत्यंत माफक दरामध्ये रेकॉर्डिंगची सोय राज स्टुडिओ मध्ये करण्यात आली आहे.



विशेषतः विदर्भातील नवोदीत गायकांसाठी राज ऑडिओ स्टुडिओ एक नवा पर्याय आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक प्रा. डॉ. अनिलकुमार खोब्रागडे यांनी राज ऑडिओच्या नुकत्याच झालेल्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून व्यक्त केले. प्रमुख अतिथी, भीमवाडी फेम गीतकार अशोकदिप भगत, चंद्रशेखर शेंडे (गायक) डॉ. हेमलता पोपटकर (गायीका), प्रा. रविंद्र दारुडे, मिलिंद जिभे (गायक) व राज वानखेडे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व मान्यवरांना शाल व सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात आले. त्यांचे हस्ते नवीन भीमगीतांच्या गाण्याचे पोस्टर व व्हीडिओचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी प्रा. डॉ. अनिलकुमार खोब्रागडे यांनी 'येथे समानतेचा' हे भीमगीत सादर केले. चंद्रशेखर शेंडे यांनी 'हे करुणा हे सागर', अशोकदिप भगत यांनी 'ऐसे ज्ञानी बना', डॉ. हेमलता पोपटकर यांनी 'भीमाईचा तान्हा', मिलिंद जिभे यांनी 'परादेशी भीम जाता' तर राज वानखेडे व हेमलता यांनी 'भीमानं जागा दिली आगळी' हे युगल गीत गायीले.

संचालन श्वेता वानखेडे यांनी केले. प्रास्ताविक जयंत साठे तर आभार प्रदर्शन राज वानखेडे यांनी केले. याप्रसंगी समर्थ नगरीतील प्रतिष्ठीत नागरीक दत्ताजी फडणवीस, विनय निमगावकर, अविनाश डबली, स्वप्नील डावूले व इतर संगीतप्रेमी नागरीक मोठया संख्येने उपिस्थत होते.

# निवासी शाळेत सामाजिक समता सप्ताह उद्घाटन व मानसिक समुपदेशन



**गोदिंया :** शहरालगत असणाऱ्या नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे महाराष्ट्र शासनाच्या 100 दिवसाच्या कृती कार्यक्रम अंतर्गत दिनांक 08 एप्रिल ते 30 एप्रिल पर्यंत सामाजिक समता सप्ताह साजरा करताना, भारतीय संविधानाची प्रास्ताविक वाचन करण्यात आले, तसेच मानसिक आरोग्य समुपदेशन कार्यक्रम साजरा करण्यात आला आहे.

यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली मानसशास्त्रज्ञ चिकित्सक दिपक आगुलवार, समुपदेशक मीना रेवतकर, समुपदेश हर्षिला साखरे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मातोश्री सावित्रीबाई फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करण्यात आले. दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय संविधान प्रास्ताविक शासकीय उपक्रम म्हणून सामुहिक प्रस्तावना अद्यापक मुन्नाभाई नंदागवळी यांनी वाचन करून उपस्थितांनी वाचन केले.

जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम के. टी. एस. सामान्य रुग्णालय गोदिंया येथील समुपदेशकांनी शिक्षक, विद्यार्थी यांनी मार्गदर्शन केले आहे.

कार्यक्रमाची प्रास्ताविक मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले तर संचालन प्रदीप ढवळे यांनी करून आभार अस्मिता तेलंग यांनी मानले. यशस्वीतेसाठी नीता भलमे, मुन्नाभाई नंदागवळी, साधना पारधी, अर्चना चव्हाण, प्रगती खोब्रागडे, स्वाती राणा, कार्तिक शहारे, तुषार महाजन यांनी परिश्रम घेतले आहे.

# बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी महोत्सव निमित्त चित्रप्रदर्शनी व अभिवादन परिक्रमा

**नागपूर :** अखिल मानव जातीच्या उत्थानासाठी आणि त्यांना अनंत यातना तथा दुःखातून मुक्त करण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावणारे महापुरुष चक्रवर्ती सम्राट अशोक, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, महापंडित राहुल सांस्कृत्यायन, महात्मा ज्योतिबा फुले, भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व क्रांतिकारी महापुरुषांच्या जयंती तथा स्मृतिदिनानिमित्त अभिवादन परिक्रमा करण्याकरिता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठान, बाबु हरदास एल.एन. बहुद्देशिय संस्था, बौद्ध इतिहास संस्कृति आणि संशोधन संस्था आणि नागार्जुन संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक 9 एप्रिल ते 14 एप्रिल 2025 स्थळ- बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे सभागृह डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर समोर, सिद्धार्थ नगर, कामठी रोड, नागपूर येथे चित्रप्रदर्शनीचे आयोजन केले आहे.

या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन भदंत नागदीपंकर महाथेरो यांच्या हस्ते स. 9:30 वाजता होईल. करीता मोठ्या संख्येने लोकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सहभागी संस्थेच्यावतीने केले आहे.




बुधवार, दि. 9 एप्रिल 2025 सकाळी 8:30 वाजता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या इंदोरा चौक येथील पुतळ्याला माल्यार्पण तथा अभिवादन सकाळी 1:00 वा. बरि. राजाभाऊ खोब्रागडे सभागृहातील पुतळ्याला माल्यार्पण तथा अभिवादन. स. 9:30 वाजता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन संघर्षातील घडामोडींवर आधारित चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन- हस्ते भदंत नागदीपंकर महाथेरो गुरूवार, दि. 10 एप्रिल सकाळी 9:30 वाजता महापंडित राहुल सांस्कृत्यायन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण तथा अभिवादन. 'शुक्रवार, दि. 11 एप्रिल सकाळी 9:30 वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व अभिवादन. शनिवार, दि. 12 एप्रिल सकाळी 9:30 वाजता डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला माल्यार्पण तथा अभिवादन. सोमवार, दि. 14 एप्रिल सकाळी 9:30 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण तथा अभिवादन!

रिपब्लिकन मुव्हमेंट, आबेडकराईट मुव्हमेंट ऑपा कल्चर ॲण्ड लिटरेचर, स्त्रिभूषण रमाई आंबेडकर संस्था, संविधान परिवार, व्हॉईस ऑप इन्डिजनस पिपल फॉर जस्टीस ॲण्ड पीस (व्हीआयपीजेपी), बुद्धिस्ट अकादमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट, जयभिम प्रवर्तक बाबु हरदास एल.एन. स्मृती समिती, अनाथपिंडक परिवार, दीक्षाभूमी वंदना संघ, महामाया महिला सेवा संस्था, हरदासनगर अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी, पिपल्स वेलफेअर सोसायटी-नागपूर, आगाज इंडिया टी.व्ही. चॅनेल, दै. वहुजन सौरभ परिवार, डॉ. आंबेडकर सोशल फोरम, सहयोग मित्र परिवार बहुउद्देशिय विकास संस्था, त्रिरत्न हास्य क्लब, दीक्षाभूमी परिवार संस्था, पृथ्वीराज बन्सोड प्रतिष्ठान, स्वतंत्र मजदूर युनियन, संकल्प स्वयंसेवी सामाजिक संस्था आणि इतर संघटना सहभागी आहेत.

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या स्मृतिंना विनम्र अभिवादन!



## 18 वर्ष राज्यसभा सदस्य बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे

अतिशय गर्भ श्रीमंत घरात जन्माला आलेले बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी दलित हक्काच्या लढ्यासाठी आपले जिवन समर्पित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले. भारतात परतल्यानंतर डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीमध्ये युवा अवस्थेमध्ये प्रवेश केला. बॅरि. राजाभाऊ खोबरागडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अत्यंत विश्वासू सहकारी होते म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी त्यांना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून घोषित केले होते. 1952 ची भंडाऱ्याची लोकसभा निवडणूक डॉ. बाबासाहेबांनी लढवली तेव्हा बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी त्यांच्या प्रचाराची संपूर्ण धुरा सांभाळली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष खासदार एन. शिवराज तर सरचिटणीस बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी जबाबदारी स्वीकारली होती. खोब्रागडे यांनी आपले संपूर्ण जीवन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक व राजकीय चळवळ पुढे नेण्यासाठी निष्ठेने प्रयत्न केले, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे राज्यसभेचे 18 वर्ष सदस्य होते. तसेच राज्यसभेचे पहिले विरोधी पक्षाचे उपसभापती होण्याचा मान मिळाला होता.



- इंजि. राहुल बागडे.

## आम्ही सारे रिपब्लिकन

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष व राज्यसभेचे माजी उपसभापती बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांचे कट्टर समर्थक म्हणून व नोकरीवर असताना सुद्धा कार्यकर्ता म्हणून सक्रिय कार्य केले. माजी खासदार ॲड. दत्ता कट्टी, माजी आमदार जे. ईश्वरीबाई, शिवराम मोघा, ॲड. अविनाश कट्टी, प्रा. अशोक गोडघाटे, दिवंगत उमाकांत रामटेके, माजी आमदार उपेंद्र शेंडे, माजी नगरसेवक प्रल्हाद दुर्गे यांच्या नेतृत्वात युवक संघाचा पदाधिकारी म्हणून सक्रियरित्या काम करण्याची संधी मला मिळाली. पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात मी स्मृतीशेष मिलिंद संहारे यांचे सोबत राहून पक्षाचे सक्रियरित्या काम केले. स्मृतीशेष इकबाल अहमद, गिरीश बाबू खोब्रागडे, श्यामबाबू खोब्रागडे, अमृतराव गजभिये, यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी प्राप्त झाली मी स्वतःला धन्य समजतो.



- मिलिंद मेश्राम

## उपेक्षितांचे कैवारी बॅरि. खोब्रागडे

नागपूर ही मध्यप्रांत सी.पी. ॲन्ड बेरारची राजधानी होती. आता नागपूर ही महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाला लोक मान्यता मिळाली. नागपूर हायकोर्टची स्थापना बॅरिस्टर साहेबांच्या पुढाकाराने झाली. बिडी मजूदर, मॉडेल मिल कामगार व एम्प्रेस मिल कामगार यांना पेंशन आणि आरोग्य सेवा मिळवून दिली. 6 ते 14 वर्षापर्यंत मुलामुलींना मोफत शिक्षण आणि एस.सी, एस.टी., ओ.बी.सी.च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून दिली.

सन 1966 चंद्रपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून चंद्रपूर शिक्षणाचे माहेरघर बनविले आणि ब्रम्हपुरी येथे वस्तीगृह व विद्यालयाची स्थापना केली.

नागपूर विद्यापीठात बॅरिस्टर साहेब सन 1964, 1965,1968, 1969 या वर्षात सिनेट मेंबर होते. त्यांच्याच प्रयत्नाने डॉ. आंबेडकर थॉट, बुध्दीस्ट चेअर पाली प्राकृतच्या अभ्यासिकांचा प्रारंभ झाला.

धम्मदिक्षा :-

1 जानेवारी 1958 ला शेड्युल कास्ट फेडरेशनचे अधिवेशन अहमदनगर येथे असताना त्यांच्या उपस्थितीत ख्रिश्चन धर्मातील 3000 लोकांनी बौद्धधम्म दिक्षा घेतली, भंडारा येथे 10000 लोकांना बुद्ध धम्माची दिक्षा दिली. चंद्रपूर येथिल बोरगावात धम्मादिक्षा दिली. त्यामध्ये ' जयभीम की है पुकार बौध्द धम्म का करो स्विकार' हा नारा दिला.

अश्या या राजकिय, समाजकार्य, धम्मकार्य , शिक्षणकार्य करणाऱ्या वटवृक्षासोबत कार्य करणारे विधानसभा सभेचे उपसभापती अँड सूर्यकांत डोंगरे, माजी महापौर सखराम मेश्राम, स्थायी समिती अध्यक्ष ताराबाई मेश्राम, प्रा. रणजीत मेश्राम, प्रा. अशोक गोड?घाटे, माजी नगरसेवक हरिदास टेंभूर्ण, आनंद चौरे , माजी महापौर रामरत्न जानोकर , माजी महापौर सखाराम चहांदे, माजी महापौर तेजराम सोमकुंवर, स्थायी समिती अध्यक्ष बाजीराव साखरे, माजी नगरसेवक उमाकांत रामटेके, डॉ भाऊ लोखंडे, महेंद्र गजभिये, जयवंताबा मेश्राम, माजी आमदार उपेंद्र शेंडे, रमाबाई शेंडे, माजी नगरसेवक व आमदार नानाजी शामकुळे, प्राचार्य सूर्यभान वाघमारे, रूपकांताबाई दहिवले यांच्या सोबत कार्य करण्याची संधी मिळाली . सहवास ,संपर्क, संवाद यातून खूप काही शिकायला मिळाले. त्यातून मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बँक नागपूर चा संचालक,मनपा माजी नगरसेवक व पक्षनेता बसपा, वंचित बहुजन आघाडी पूर्व विदर्भ संयोजक म्हणून कार्यरत आहे. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या स्मृतीदिना निमित त्यांना कोटी कोटी प्रणाम आणि अभिवादन करतो.



-मुरलीधर मेश्राम

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648